दिनांक ११/०१/२०२४

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ११/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपुरी गेट अप नं ०९/२०२४ कलम ३२६,३२४, ३४ भादवी | रौनक पार्क आलुवाले यांचे वाडी जवळ अमरावती | दि. १०. ०१.२०२४ चे १५.०० वा दि.१०.०१. २०२४ चे २०.५९ वा | रियाजउद्दीन पठान शमसोद्दीन पठान वय ३४ वर्ष रा अलीम नगर फारूखी आजम मस्जिद अमरावती अमरावती | १.दानिश २. मुन्ना ३. आसिफ ४.एक अनोळखी व्यक्ती र्सव रा रौनक पार्क आलुवाले यांचे वाडी जवळ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी यांना फोन आला कि त्यांचे म्हशी चारणारा ईसम नामे मतीन यास आरोपी क्र १ व २ यांनी मारहान केली आहे वरून ते त्याचे भावासह आरोपी यांना समजविण्यास गेले असता आरोपी क्र १ ते ४ यांनी संगनमत करून फिर्यादी याचे डोक्यावर आरोपी क्र १ यांने लोंखडी रॉड ने मारले तसेच आरोपी क्र २ यांने तलवार फिर्यादीचे डोक्यावर मारली त्यामुळे फिर्यादीला जखम होवुन रक्त निघाले तसेच तलवार हातात पकडली असता हाताला सुदृधा जखम झाली तसेच आरोपी क्र ३ ते ४ यांनी फिर्यादीचे भावास लाकडी काठीने मारहान केली त्यामुळे त्याचा डाव्या हाताला दुखापत झाली अशा फिर्यादीचे जिल्हा सामान्य रूग्णालय अमरावती येथे मा डॉ.सा समक्ष दिलेल्या बयानावरून व मेडीकल सर्टिवरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | नागपुरी गेट अप नं १०/२०२४ कलम ३२४,५०४, ३४ भादवी | रौनक पार्क आलु वाले खेत के पास अमरावती | दि. १०. ०१.२०२४ चे १५.०० वा दि.१०.०१. २०२४ चे २३.०४ वा | कामरान खान आसिफ खान वय २२ वर्ष रा रौनक पार्क आलु वाले खेत के पास अमरावती | 1भैस वाला मतीन अधिक २ सर्व रौनक पार्क आलु वाले खेत के पास अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे घरी हजर असतांनायातील आरोपी क्र १ हा त्याचे घराजवळ भैस चारत होता आरोपीची भैस फिर्यादीचे घराला खेटत होती तेव्हा फिर्यादीव त्याच्या बहिनीचा मुलगा दानीशयाने त्यास समजावले असता आरोपी क्र १ याने लठ फिरविण्यास सुरवात केली तर त्याचा लठ फि चे बहिनीचे मुलाला लागल्यामुळे त्याच्यात हातापाई झाली थोडया वेळानंतर दोन लोक ॲक्टीव्हा गाडीने तेथे आले व गाडीवरून उतरून शिविगाळ करू लागले त्याच्याजवळ लोखंडी रॉड होते त्यापैकी एकाने र्फियादीला लोखंडी रॉड मारून जखमी केले अशा फिर्यादीचे बयानावरून व मेडीकल सर्टिवरून सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पो स्टे वलगाव अप.क्रं.09/ 2024 कलम 354,294, 34 भा.द.वि. प्रमाणे दाखल | अमरावती | घटना ता.वेळ - दि. 10/01/2024 चे 14/00 वा. दा ता वेळ – दि 10/01/2024 चे 22/29 वा | एक महीला | 1) विक्की डोंगरे 2) सचिन गुंफेकर दोन्ही रा.. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, दि.10/01/2024 रोजी चे दुपारी 02/00 वा.मी अँगणात नळाचे पाणी आल्याने झाडुने साफ करीत होती.तेव्हा माझे घरा शेजारी राहणारे विक्की डोंगरे,आणि सचिन गुंफेकर त्यांचे घराचे वर गच्ची वर होते.तेव्हा ते मला पाहुन हात इशारे करीत होते.मी त्याचे कडे लक्ष देत नव्हती. तेव्हा मला पाहुन सचिन गुंफेकर याने म्हटले की, तुला आता वेळ मिळाला काय असे म्हणुन दोघेही हात ईशारे करीत होते.त्यांचे कडे लक्ष दिले नाही .म्हणुन त्या दोघानी म्हटले तु आमचे कडे लक्ष देत नाही अश्लील शिवीगाळ केली .तेव्हा माझे मनात लज्जा निर्माण झाली त्याचे पासुन माझे जिवीतास धोका निर्माण झाला आहे.माझे रिपोर्ट ची चौकशी व्हावी,माझा जबानी रिपोर्ट माझे सांगणे प्रमाणे बरोबर लिहीले वाचुन पाहले बरोबर लिहीला आहे.अशा रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## स्त्रिअत्याचार

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे राजापेठ अप क्र.२५/२०२४ कलम ४९८ अ ,३४ भादवी | अमरावती | दि. ०२/०७/२०२१ते १९/१०/२०२३ दा. ता. वेळ - दि. १०/१/२०२४ चे १६.१९ वा. द | एक महीला | १.परीष्कार रामकृष्ण नागरीकर अधिक ४ नातेवाईक सर्व रा. अकोला | हकीकत असा प्रकारे आहे की यातील सर्व आरोपीतांचा फिर्यादीला नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी शारीरीक व मानसीक त्रास दिला फि. चे जबाणी रीर्पोट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अप नं पो स्टै राजापेठ २६/२०२४ कलम ४५४, ३८० भादवी | फिर्यादीचे राहाते घरी क्रांती कॉलनी लेन नं ०४ अमरावती | दि. १०/०१/२० २४चे सकाळी १०.०० वा ते दूपारी ०३.०० वा दा. ता. वेळ - दि. १०/१/२०२ ४ चे २०.५४वा. | योगेश किशेरराव अढावू वय ३६ वर्ष रा.क्रांती कॉलनी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हा सकाळी १०.००वा डयुटीवर गेला असता ामुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमूद अज्ञात चोराने फि.चे घराचे कोंडा ेलूप तोडून त्याचे घरातील दोन्ही बेडरूम मधिल लोखंडी कपाट उघडून त्यामधून वरील गेलेला मूददेमाल एकून ३,९२,०००रुपयाचा चोरून नेला अशा फिर्यादीच्या दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गून्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो .स्टे कोतवाली अप नं ०९/२४ कलम ३७९ भादवि | अमरावती | घटना ता वेळ दि १०/०१/२०२४चे दुपारी ०१.०० वा दाखल ता वेळ १०/०१/२०२४ चे १७.१० वा | एक महीला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की मी समक्ष पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देते की आज दि १०/०१/२४रोजी दुपारी ०१.०० वा दरम्यान मी माझा भाउ अशोक वानखडे व भावजय यांना घेवुन ईर्विन दवाखान्यात त्याच्या अपघात झाल्याने त्यासबंधात उपचार व एक्सरे काढणे करिता आली होती व काउंटरवरुन तिकीट काढुन एक्सेर साठी वार्ड मध्ये त्याना घेवुन गेली तेव्हा माझ्या जवळ हॅन्ड पर्स होती काळ्या रंगाची त्यामध्ये ५०००/- रु पर्स मध्ये ठेवले होते व त्याना एक्सेर साठी घेवुन गेली व काळ्या रंगाची माझी हॅन्ड पर्स बाजुला खआली ठेवली होती त्याचा उपचार करुन परत पर्स घेणे करिता आली तर पर्सची चेन मला उघडलेली दिसली तेव्हा मी पर्स मध्ये ठेवलेले कागदपत्र पैसे पाहले तर कागदपत्रे होते पण ठेवलेले ५०००/- रु पर्स मध्ये नव्हते तो कोणीतरी अज्ञात चोराने पर्सची चेन उढडुन नेले अशा फिर्यादिच्या जबानी रिपोर्ट वरुन व डि सा यांचे आदेशाने सदरचा पोस्टे ला गुन्हा दाखल |

## वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे कोतवाली अप क्र १०/२०२४ कलम ३७९ भादवि | सुविधा गार्मेट च्या समोर उड्डान पुलाखाली जयस्तंभ चौक अमरावती | गु. घ. ता. वेळ् दि. ०८/०१/२४ चे दुपारी ११/०० वा गु. दा. ता. वेळ दि १०/०१/२४ च १८.४८ | प्रशामत अशोकराव धंदर वय ३६ वर्ष रा हनुमान नगर पो स्टे खोलापुरी गेट अमरावती | अज्ञात | हकीक्त अशा प्रकारे आहे की मी समक्ष पो स्टे ला येवुन जबानी रीपोर्ट देतो की वर नमुद ठिकाणी माझे कुटुबासह राहते व श्रध्दा साडी सेंन्टर येथे मागील ८ वर्षापासुन काम करतो दि ०८/०१/२४ रोजी स ११.०० वा दरम्यान मी साडी सेंटर येथे कामा करिता आलो व माझ्या जवळ् असलेली फँशन प्रो काळ्या रंगाची MH २७ AQ २१०० जिचा इंजीन क्र HA१०EDBHH२७९१०, चेचीस क्र MBLHA१०EWBHH२६६६९ कि अं २०,०००/- रु मी माझी गाडी सुविधा गार्मेट च्या समोर उड्डान पुलाखाली जयस्तंभ चौक येथे लावुन दुकानातील कामाकरिता गेलो व रात्री अंदाजे ०८.०० वा दरम्यान दुकाणातील कामाकरिता खआली आलो मी गाडी ज्या ढिकाणी लावली होती ती घेणेकरिता गेलो असता ठेवलेल्या ठिकाणी माझी गाडी दिसुन आली नाही मी त्यानंतर गाडीचा आज पावेतो शोध घेतला पण गाडी मिळ्ाली नाही माझी गाडी कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली आहे अशा फीर्यादी चे जबानी रि वरुन पो. स्टे ला सदरचा गुन्हा दाखल |

## सरकारी कामात अडथडा

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र १८/२०२४ नित ३५३, ३४१, १४३, ५०६, भादवि सहकलम १३५ मपोका | राजुरा नाका मार्डी रोड अमरावती | दि १०.०१.२०२४ चे १०.१५ वा दरम्यान दि १०.०१.२०२४ चे १९.२६ वा | अनिल श्रीनाथ पांडे वय ५२ वर्ष व्यवसाय नोकरी चालक अमरावती आगार रा महेंद्र विदयालयासमोर चपराशीपुरा अमरावती | अज्ञात ८ ते १० इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि १०.०१.२०२४ रोजी त्याची अमरावती ते आर्वी एस टी बस गाडी क्र एम एच ४० एन ६२०७ या गाडीवर सकाळी १०.०० वा डयुटी होती पण ते त्यांचे डयुटीवर सकाळी गेले असता त्यांचे सोबत वाहक म्हणुन एक महीला यांची डयुटी होती ते व वाहक असे एस टी बस ने सकाळी १०.०० वा अमरावती आगारातुन प्रवासी भरून आर्वीच्या दिशेने निघाले होते आर्वीच्या दिशेने जात असतांना १०.१५ वा दरम्यान राजुरा नाका मार्डी रोड येथे अज्ञात ८ ते १० लोकांनी एकत्र येवुन फिर्यादी यांच्या एसटी बससमोर आडवे येवुन बस गाडी अडविली त्या लोकांनी आरडा ओरड करीता फिर्यादी यांना बसचे खाली उतरण्यास सांगितले त्यांचा जमाव पाहुन व फिर्यादीची गाडी पुढे नेवु देत नव्हते त्यामुळे फि त्यांचे सांगणेप्रमाणे खाली उतरले असता त्यांनी फिर्यादी यांना आम्ही कोणासाठी बंद ठेवत आहोत व लढत आहोत तुला माहित नाही का शासनाकडुन नविन आलेल्या हिट ॲन्ड रन कायदयाविरोधान आम्ही बंद पुकारलेला आहे आणि तुम्ही बंद मध्ये सहभागी न होता एसटी बस गाडी चालवित आहात असे म्हणुन फिर्यादी यांना जमा झालेल्या लोकांनी ओढताण करून फिर्यादीच्या गळयात चपलाचा हार घातला व ते लोक फिर्यादी यांना म्हणाले की तु गाडी घेवुन परत जा गाडी घेवुन पुन्हा यायचे नाही अशी धमकी दिली त्यावेळी काही लोकंनी सदर घटनेची व्हिडीओ रेकॉर्डींग केली व ती समाजमाध्यमामध्ये व्हायरल केली आहे त्यानंतर फिर्यादी यांनी एसटी बस काढली व आर्वी करिता निघाले फिर्यादी आर्वीला १२.०० वा पोहोचले व झालेल्या घटनेबाबत माहिती त्यांचे वरीष्ठा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाहतुक निरीक्षक श्री श्रीकांत देवरे यांना दिली व आर्वी वरून दुपारी ०४.०० वा अमरावतीला परत आले व पोस्टे फ्रेजरपुरा येथे नमुद ८ ते १० अज्ञात इसमांविरूध्द कार्यवाही करण्याकरिता रिपोर्ट देण्यात आाला अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## गैरकायदा मंडळी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र १९/२०२४ नित १४३, ३४१, भादवि सहकलम १३५ मपोका | कुंभारवाडा चौक जुना बायपास अमरावती | दि १०.०१.२०२४ चे १०.०० वा दरम्यान दि १०.०१.२०२४ चे २१.४९ वा | सरतर्फे नापोकॉ राजाभाऊ जनार्धन राऊत बनं २३ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | १ अयुब चौधरी २ कासीम जुम्मा ३ मोहीम सलिम मांजरे ४ सलमान गंगु रायलीवाले ५ समिर रहेमान रायलीवाले ६ उस्मान हुसैन रायलीवाले ७ वसिम अहमद बेनिवाले ८ अकबर कासम चौधरी ९ योगेश धनिराम नकाते १० संदिप मारोतराव भिमकर ११ असलम युसुब चौधरी १२ रहीम मुन्ना चौधरी सर्व रा फ्रेजरपुरा अमरावती १३ ओकांर सुर्यभान वाळवे रा वडरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी सोबत पोहेकॉ अमोल पाटील बनं १२६२ सह पोस्टे हददीत पेट्रोलिंग करित असता अंदाजे सकाळी १०.०५ वा दरम्यान गुप्तबातमीदाराकडुन माहिती मिळाली की काही इसम कुंभारवाडा चौक जुनाबायपास येथे हिट अँन्ड रन कायदयाच्या निषेधार्थ चारचाकी वाहने थांबवुन रास्तारोको आंदोलने करीत आहे अशा माहिती वरून फिर्यादी यांनी सदरची माहिती पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे फोन व्दारे दिली व मदतीला अतिरीक्त पोलीस बल म्हणुन बिट मार्शन , सीआर मोबाईल व पोलीस स्टॉफ पाठविण्याबाबत सांगितले व पोस्टॉफ घटनास्थळी पोहचल्यावर आंदोलनकर्ते यांना आपण आंदोलन योग्य रितीने व परवानगी घेवुन रितसर कायदेशिर मार्गाने करावे व येथुन निघुन जाणेबाबत समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते व ते घोषणा देत होते की हिट अँन्ड रन कायदा कायदा करो या प्रकारे घोषणा देत होते त्यांनतर घटनास्थळी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पोस्टेचे बिट मार्शल सीआर असा पोलीस स्टॉफ घटनास्थळी येतांना पाहुन सदर आंदोलकर्ते हे तेथुन पळुन गेले आंदोलन करणा-या आरोपीतांची नावे १ अयुब चौधरी २ कासीम जुम्मा ३ मोहीम सलिम मांजरे ४ सलमान गंगु रायलीवाले ५ समिर रहेमान रायलीवाले ६ उस्मान हुसैन रायलीवाले ७ वसिम अहमद बेनिवाले ८ अकबर कासम चौधरी ९ योगेश धनिराम नकाते १० संदिप मारोतराव भिमकर ११ असलम युसुब चौधरी १२ रहीम मुन्ना चौधरी सर्व रा फ्रेजरपुरा अमरावती १३ ओकांर सुर्यभान वाळवे रा वडरपुरा अमरावती असे असुन या आरोपीतांनी येणा-या जाणा-या चारचाकी मोठे वाहनांना थांबवुन ठेवुन वाहतुकीस अडथळा निर्माण केला वरील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मा पोलीस उपायुक्त साहेब मुख्यालय अमरावती शहर यांचा आदेश क्र पोआअ/विशा/कावसु/४४/२०२४ दि ०५.०१.२०२४ दि ०७.०१.२०२४ चे ००.०१ वा पासुन ते दि २१.०१.२०२४ चे २४.०० वा पर्यंत जमावबंदी आदेश अमरावती शहरात लागु असतांनासुध्दा कोणतीही परवानगी न घेता कुंभारवाडा चौक जुना बायपास अमरावती येथे वरील नमुद कार्यकर्त्यांनी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशिर जमाव जमवुन आंदोलन केले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ५५/२४ कलम १४३ १४७ ३५५ ३४१ ३५३ २९० भादवी सह कलम १११/११७ १३५ मपोका | लालखडी चौक वलगाव रोड अमरावती | दि १०.१.२०२४ चे १०.२० वा<br><br>दि १०.१.२०२४ चे १८.४९ वा | श्री फकीरा गणपत पवार वय ३६ जात गोंड धंदा चालक रा ग्राम लावना ता मंगरूळ जि वाशीम | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी आज दि १०.१.२०२४ रोजी १०.२० वा दर लालखडी चौक वलगाव रोड अम येथुन एस टी बस एम एच २० जीसी ३८३० घेवुन जात असता अं २० ते ३० लोक माझे बस समोर आले व त्यांनी नारेबाजी करून मला बस खाली उतरवीले व माझे गळयात चप्पलीचा हार घातला तसेच त्यांनी माझे सोबत मोबाइलमध्ये व्ही डी ओ काढले व जोरलोराने हसु लागले तरी मला चपलाचा हार घालुन अपमान करणा-या वीरूध्द कार्यवाही व्हावी म्हणुन पोस्टे ला रीर्पोट देत आहे |
| ३ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ५६/२४ कलम १४३ १४७ ३५५ ३५२ २९० भादवी सह कलम १११/११७ १३५ मपोका | पंचवटी चौक रोड अमरावती | दि १०.१.२०२४ चे १०.५ वा ते ११.०० वा<br><br>दि १०.१.२०२४ चे २०.३३ वा | पोउपनी गणेश राउत पोस्टे गाडगेनगर अमरावती | श्री प्रतीक श्रीकांत देशमुख वय ३४ रा राठी नगर अम २ मोटु बुंदेले रा वढाळी अम अधीक तीन ते चार र्कायकरते | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतोवळी व ठीकानी मा पोलीस आयुक्त अम शहर यांचा आदेश क्र पो आअ /विशा /कावसु /४४/२०२४ दि ५.१.२०२४ नुसार कलम ३७ , १,३ मपोकाची अनुसुचना व प्रतीबंधात्मक आदेश निर्गमती करण्यात आली असतांना सुध्दा वरील नमुद वाहन चालक कुती समीती अम चे कार्यकर्ते यांनी आज दि १०.१.२०२४ चे १०.५ वा ते ११.०० वा पंचवटी चौक येथील येना-या जाना-या वाहतुकीस अडथळा र्नीमाण करून वाहतुक थांबवीली व घोषना बाजी केली आयसर चारचाकी वाहन क्र एम एच २७-०२८९ चे चालक हे त्याचे वाहनातुन खाली उतरून त्याच्या गळयात अम जि वा चालक कुती समीतीचे र्कायकर्ते श्री प्रतीक श्रीकांत देशमुख श्री मोटु बुंदेले रा वडाळी अधीक तीन ते चार कार्येकते यांनी चपलाचा हार घालुन स्वताचे फोटो काढले अशा आंदोलन र्कते यांनी प्रतीबंधक आदेशाने उल्लघन केले वरून त्याचे वीरूध्द कार्यवाही व्हावी म्हणुन पोस्टे ला रीर्पोट देत आहे |
| ४ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ५७/२४ कलम १४३ १८८ भादवी सह कलम १३५ मपोका | डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ईवींन चौक अमरावती | दि १०.१.२०२४ चे १०.३० वा ते ११.४५ वा<br><br>दि १०.१.२०२४ चे २१.२८ वा | पो उप नी निलेश करे पोस्टे गाडगेनगर अम | १ नंदकीशोर काळे २ श्री अमीत वानखडे<br>३ श्री राजेश वानखडे<br>४ श्री मनोज मारोडकर<br>५ श्री प्रशांत दंडाळे<br>६ श्री दीपक वानखडे<br>७ श्री विशाल सुरोशे<br>८ श्री प्रवीन मोपारी<br>९ श्री रीतेश तेलमोरे<br>१० श्री मोहम्मद अफसर शेख हसन ११ श्री शकील भाई सॅव रा अमरावती अधीक ५० ते ६० र्कायर्कते | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतोवळी व ठीकानी मा पोलीस आयुक्त अम शहर यांचा आदेश क्र पो आअ /४४ /२०२४ दि ५.१.२०२४ नुसार कलम ३७ , १,३ मपोका अधीसुचना व प्रतीबंधात्मक आदेश निर्गमती करण्यात आली असतांना सुध्दा वरील नमुद वाहन चालक कुती समीती अम चे कार्यकर्ते यांनी सदर मरांचा हा वीनापरवाना हा कोनत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता गौरकायदयाची मंडळी जमा करून आज दि १०.१.२०२ चे १०.३० वा ते ११. प्रतीबंधक आदेशाने उल्लघन केले मी लोकसेवक म्हणुन नमुद आरोपीतानवर ककलम १४३.१८८ भादवी १३५ मपोका सह कलम नुसार कार्यवाही व्हावी म्हणुन पोस्टे ला रीर्पोट देत आहे |

## प्राणांकीत अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र. १२/२०२४ कलम २७९, ३०४(अ) भा.दं.वि.सह कलम १३४मो.वा. का. | कोंडेश्वर रोड खोब्रागडे विटाभट्टी जवळ | घटना ता.वेळ - दि.२२.१२. २०२३ चे२०.३० वा. माहिती ता.वेळ - दि.१०.०१. २०२४ चे १९.०० वा. दाखल ता.वेळ - दि१०.०१.२ ०२४ चे २०.०५ वा. | मुकेश रमेश उसरे वय- ५१ वर्ष रा. उसरेवाडा जुनी वस्ती बडनेरा तर्फे पोहेका संजय भेलाये ब.नं.१२१२ पोस्टे बडनेरा | मिनी ट्रक ४०७ पांढ-या रंगाचा क्रमांक माहित नाही चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.यांच्या कडे तपासावर असलेला मर्ग क्र.९२/२३ कलम १७४ जाफौ मध्ये तपासा दरम्यान अनोळखी इसमाचे ओळख पटल्याने त्याचे नातेवाईक यांनी अनोळखी पुरुषाचे नाव प्रदीप महादेव अडागे वय- २८ वर्ष रा. शिवाजी नगर अमरावती असे सांगितले. व सदर मर्ग मधील मृतक यांचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त करण्यात आला असुन त्यामध्ये वैद्यकीय अधि.यांनी मरणाचे कारण छातीला मार लागल्याने अतिरिक्त रक्तस्त्राव झाल्याने दिला आहे. परंतु छातीला मार कशामुळे लागला याबाबत स्पष्ट दिले नसल्याने वैद्यकीय अधि.यांना शवविच्छेदन अहवालाची क्युरी करिता पोस्टे जा.क्र.७३/२४ दि.०८.०१.२०२४ रोजी पत्र दिले असता वै.अधि. श्री शिवाजी राठोड सा.यांनी आज दि.१०.०१.२०२४ रोजी शवविच्छेदन अहवालाची क्युरी परिक्षण करुन अहवाल दिला की सदर मर्ग मधील मृतक यांच्या शरीरावर व छातीला जो मार आहे. तो रस्ता वाहतुक अपघातामुळे झाला आहे. अशा लेखी अभिप्रायावरुन पोस्टे ला दि.२२.१२.२०२३ रोजी माहिती देणारा इसम मुकेश रमेश उसरे वय- ५१ वर्ष यांचे दि.०४.०१.२०२४ रोजी घेतलेल्या बयानानुसार सदर मृतक यास दि.२२.१२.२०२३ रोजी रात्री अं.२०.३० वा. दरम्यान कोंडेश्वर डांबरी रोडवर खोब्रागडे यांच्या विटाभट्टीजवळ एक इसम पडलेला होता. त्यांच्या आजुबाजुला जमलेल्या लोकांनी सांगितले की, कोंडेश्वर मंदीराकडे जाणा-या मिनी ट्रक ४०७ पांढ-या रंगाचाया गाडीने त्या इसमाला धडक देवुन निघुन गेला. तो इसम जमिनीवर पडला त्या गाडीचा नं माहित नसल्याचे सांगितले. असा तपासावरुन व बयानावरुन तसेच वैद्यकीय_अधिकारी यांनी दिलेल्या क्युरी अहवालावरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | नांदगाव पेठ अप.क्र.०८/ २४ कलम २७९, ३३७ भादवि | होटेल ग्रीनलॅन्ड जवळ एन.एच-६ अमरावती नागपुर रोड | दि.१०/०१/ २४ चे १२/४५ वा. दि.१०/०१/ २४ चे १६/५१ वा. | सचिन ओंकारराव खरबडे वय ३९ वर्षेरा. अवधुत महाराज मंदीर जुनी वस्ती रहाटगाव | टाटा ट्रक क्र. GJ-१२-AY-६५४२ चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी तक्रार दिली कि त्यांचे वडील त्यांचे दुचाकी स्कुटी झेस्ट क्र. MH-२७-BR-३५९५ सोबत फि. ची आई असे वास्तुचे कार्यक्रमाकरीता जात असतांना नमुद घटनास्थळी टाटा ट्रक क्र. टाटा ट्रक क्र. GJ-१२-AY-६५४२ चा चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन फि. चे वडीलांचे दुचाकीला मांगुन ठोस मारुन फि. व त्यांचे आईला जखमी केले अशा फिर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पोस्टे गाडगेनगर अम अपक्र ५४/२४ कलम २७९ ४२७ ५०६ भादवी | कठोरा नाका अमरातवी | दि १०.१.२०२४ चे २.३० वा १०.१.२०२ चे १८.०९ वा | संतोष गोवींदराव महोलकर वय ३६ रा अधीक्षक निवास व्ही एम व्ही रोड अमरावती | एम एच १२ एसएफ१४३६ चा गाडी चालक | हकीकत अशा प्रकारे आहे की फीर्यादी हा स्वताचे मुलाला फौजदार शाळेतुन स्वताचे फोरव्हीलरने गाडी क्र गाडी क्र कठोरा नाका एम एच २७ डी इ ४७६१ ने घरी येत असतांना महीद्रा बेलोरो गाडी क्र एम एच १२ एस एफ १४३६ या गाडी चालकाने आपले वाहने भ्रधाव वेगाने चालवुन निष्काळजी पनाने माझ्या गाडीला मागुन उजव्या बाजुला धडक दीली त्यामुळे माझे गाडीचे नुकसान झाले तो तेथे थांबला व मला म्हणाला की तुमच्या कडुन जे होते ते करूनघे असे म्हणुन तेथुन नीघुन गेला मला व माझ्या मुलाला कीरकोळ मार लागला वरून र्कायवाही होणेस वीनंती आहे |
| 5 | पो.स्टे. भातकूली अपनं. 07/24 कलम 279,337 भादवि | ग्राम ऋणोंचनचा नदीचा पूल ता. भातकूलीजि. अमरावती | घटनातावेळ ॾ 09/01/24 चे 19/00 वा. दाखलतावेळ ॾ 10/01/24 चे 00/44 वा. | सरतर्फे ASI रायचंद बं.नं. 824 पो.स्टे. भातकूली जख्मी चे बयाना वरून तूळसाराम बारक्या भूसूम वय 40 वर्षे व्यवसाय मजूरीरा. सावरपानीता. अंजनगावसूर्जीजि. अमरावती ह.मू. रिजवान या चा विटभट्टा ग्राम ऋणमोचन | अज्ञात मोटरसायकल | हकीकत अश्या प्रकारे आहे की, आज दि. 09/01/24 रोजी सायकांळी 5/00 वा. दरम्यान मी व साहेबराव बेलसरे असे विटभट्टी वरूनपायदळ ग्राम आमला येथे येथे किराणा आनने करीता गेलो तेथे मला कैलाश कासदेकर रा. खिरपानी हा भेटला मी किराणा सामन घेतले व आमला येथून मी व साहेबराव बेलसरे रा. सावरपानी ,कैलास कासदेकर रा. असे तिघे आम्ही करत असलेल्या रिजवानच्या विटभट्टा ग्रामऋणमोचन येथे जाणे करीता पायदळ निघालो व ग्राम आमला समोरील नदीच्या पूलावरून जात असता अंदाजे रात्री 07/00 वा. सूमारास मला मागून एका मोटरसायकलने जोरदार ठोस मारली त्यामूळे मी खाली पडलो मला उजव्या पायाला मूका मार लागला असून पाय सूजला आहे तसेच माझ्या डाव्या हाताच्या ढोपराल सूध्दा खरचटले आहे मोटरसायकल ची ठोस लागल्याने मी जख्मी झालो त्यामूळे मला चक्कर आल्यासारखे झाले त्यामूळे मोटरसायकलचा नबंर पाहीला नाही माझे सोबत असलेले साहेबराव व कैलाश यांनी विटभट्यावरील माझे नातेवाईकांना फोन केला ते अपघात घडला त्या ठिकानी आले व मला अँम्बूलन्सने जिल्हा सामान्यरूग्नालय अमरावती यथे आनले आहे माझे वर वार्ड क्र. 15 येथे उपचार सूरू आहे मी व माझे सोबत विटभट्यावर काम करनार साहेबराव बेलसरे व कैलास कासदेकरयांचे सोबत ग्राम आमला येथून ऋणमोचन येथील विटभट्टी येथे येत असता पायदळ येत असता एकामोटर सायकलस्वार यांने त्याची मोटर सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून ठोस मारून जख्मी केले हेच माझे बयान आहे माझे ,गनेप्रमाने लिहीले मला वाचून दाखविले बरोबर आहे अश्या जख्मीचे बायानावरून सदरचा गून्हा दाखल |

## जुगार

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | नागपुरी गेट | अप नं ०८/२०२४ कलम १२ अ म जु का | भिवंडी गुलीस्ता नगर अमरावती मोकळया जागेत | दि १०.०१. २०२४ चे १८.०५ वा | दि १०. ०१. २०२४ चे १९. २७ वा वा | सरतर्फे पोहेका आशिष करपे ब न १३०१ पो स्टे नागपुरीगेट | सैयद तसलिम अली सैयद उमर अली वय ६० वर्ष रा भिवंडी गुलीस्ता नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त माहिती वरूनप नमुद आरोपी यांचे वर पंचासमक्ष व पो स्टाफ च्या मदतीने वरली मटका जुगार रेड केली असता आरोपी याचे ताब्यातुन १.नगदी ५२० रू २.१ ते १० आकडयाच्या वरली मटका जुगाराच्या चिठ्ठया ३.एक बॉल पेन कि.अ.१० रू असा एकुण ५३० रू चा माल मिळुन आला करिता नमुद आरोपी यांचे वर कलम १२ अ म जु का प्रमाणे सदरचा गुन्हा नोंद |

## प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे खो गेट | 10./2023 कलम 65 ई मदाका | म्हाडाकॉलनी अमरावती | दि 10.01.2024 चे 21.05 ते 21.50 वा दरम्यान | दाकल 10.01 2024 चे 23.19 वा | सरतर्फे पोहेकाँ जावेद अहमद अब्दुल समद ब न 1022 गुन्हेशाखा अम शहर | अरविंद गणेशराव गांजरे वय 35 रा म्हाडाकॉलनी अमरावती | सदर गुन्ह्याची हकीकत असा प्रकारे आहे की, प्राप्त माहीती वरुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी प्रोव्हीरेड केला असता नमुद इसमाचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे 26 नग देशी दारु बाँबी संत्रा 90 मिली च्या पावट्या किमंत 910/-रु चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष जप्त करुन आरोपीविरुद्व सदरचा गुन्हा दाखल |